नियमित दिवाणी दावा क्र. ९२/२०१७
मारूती म्हात्रे
वि.
गोटीराम पेढवी

**नियमित दिवाणी दावा क्र. ९२/२०१७ मधील नि.क्र.१९ वरील आदेश**
(ता. १७.०२.२०२३)

सदरचा अर्ज प्रतिवादी याने दिवाणी प्रक्रीया संहिताच्या आदेश ७ नियम ११ प्रमाणे दिला आहे. वादीने **नि.२६** खाली त्याचे म्हणणे देवून अर्जास जोरदार हरकत घेतली आहे.

**२.** प्रतिवादी याचे कथन की, दावा मिळकत ही त्याच्याच नावे असून त्याची भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होवून नुकसान भरपाईची रक्कम देखील त्यास मिळालेली आहे. सदर मिळकतीस त्याच्या नावाची नोंद नियमित दिवाणी दावा क्र.६१/२०१७ मधील तडजोडीस अनुसरून हुकुमनाम्याने झाली असल्याची बाब वादीस माहिती असताना देखील वादीने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. सदरचा दावा दाखल करण्याकरीता कोणतेही कारण घडलेले नाही. तसेच दावा मिळकत सन २०१२ साली संपादीत झाल्याचे व त्यानुसार प्रतिवादीस नुकसान भरपाईची रक्कम देण्यात आल्याचे वादीस माहिती असताना देखील प्रस्तुतचा दावा विलंबाने दाखल करण्यात आल्याने त्यास मुदतीच्या कायदयाची बाधा येते. त्यापुढे दावा मिळकत संपादीत होवून त्यावर अता केंद्र शासनाचा ताबा असल्याने दिवाणी न्यायालयात दावा मिळकतीविरूध्द दाद मागता येणार नाही आणि जरी दावा दाखल केला तरी त्याकरीता नॅशनल हायवे ऑथोरिटी यांना पक्षकार करणे अपेक्षित असताना वादीने त्यांना पक्षकार केलेले नाही. करीता दावा 'नॉन जॉइंडर ऑफ नेसेसरी पार्टीज' या तत्वाच्या बाधेमुळे फेटाळण्यास पात्र ठरतो. प्रतिवादीचे पुढे कथन की, वादीने सारख्याच मागणीचा नियमित दिवाणी दावा क्र.९७/२०१८ यापूर्वीच दाखल केला असून पुन्हा त्याच मागणीकरीता नवीन दावा दाखल करता येणार नाही. वादीने या दाव्यामार्फत केलेल्या मागण्या देखील सुस्पष्ट आणि विशिष्ट

नसून दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ७ नियम ३ आणि नियम ७ नुसार दावा फेटाळण्यास पात्र ठरतो. करीता सर्व त्रुटींचा विचार करता वादीचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ७ नियम ११ अनव्ये फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादीने मागणी केली आहे.

**३.** वादीने **नि.२६** खाली त्याचे म्हणणे दाखल करून अर्जास तिव्र आक्षेप घेतला आहे. वादीचे कथन की, दावा मिळकत ही जरी संपादित झाली असली तरी त्यामध्ये नॅशनल हायवे ऑथोरिटीला पक्षकार करण्याची आवश्यकता नाही. कायदयाच्या तरतुदीनुसार नॅशनल हायवे ऑथोरिटीला पक्षकार करणे गरजेचे नाही. तसेच नॅशनल हायवेज् कायदा १९५६ च्या कलम ३ (एच) ४ नुसार या न्यायालयास संपादित झालेल्या जमीनीच्या मालकीबाबतचा वाद सोडवण्याचे आधिकार देण्यात आलेले आहेत. प्रस्तुतच्या दाव्यास मुदतीच्या कायदयाची कोणतीही बाधा येत नसून दाव्याची मुदत हा तथ्ये आणि कायदा असा संमिश्रीत मुद्दा असल्याने तो या मितीस ठरविता येणार नाही. त्यापुढे प्रतिवादी कथन करत असलेल्या नियमित दिवाणी दावा क्र.६१/२००७ या दाव्यास वादी अथवा त्याचे कुटुंबिय पक्षकार नसल्याने त्या तडजोडीची माहिती वादीस असण्याचा प्रश्नच नाही. दावा दाखल करण्याकरीता घडलेले कारण आणि त्याकरीताची मागणी दाव्यात सुस्पष्टपणे मांडण्यात आलेली आहे. सोबतच नियमित दिवाणी दावा क्र. ९७/२०१८ हा दावा प्रस्तुतच्या दाव्यापुर्वी दाखल केला नसल्याने प्रस्तुतच्या दाव्यास त्या दाव्याच्या मागणीची बाधा येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. करीता प्रतिवादीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी वादीने मागणी केली आहे.

**४.** अर्ज आणि म्हणणे तसेच उपस्थित तथ्ये आणि कायदयाच्या तरतुदी यांचा विचार करता पुढील मुद्दे निश्चित करण्यात आले व त्याची कारणे निष्कर्षासह मांडण्यात आली आहेत.

| **अनु.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दाव्यास कायदयाची बाधा येते का ? | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | काय आदेश ? | अर्ज फेटाळण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबतः—**

**५.** प्रतिवादीने प्रस्तुतच्या अर्जाद्वारे विविध कायदयाच्या विविध तरतुदींना अनुसरून दावा फेटाळण्यास पात्र ठरत असल्याचे कथन केले आहे. करीता विविध कायदयाच्या तरतुदी अन्वयेचे सर्व आक्षेप एकाच मुद्दयात एकत्रित चर्चिले आहेत.

**६.** दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

**७.** प्रस्तुत अर्जाद्वारे दावा मिळकतीची भुसंपादन प्रक्रिया होवून तिचा ताबा नॅशनल हायवे ऑथोरिटीने घेतल्याने दावा या दिवाणी न्यायालयात चालू शकत नाही असे वादीचे कथन आहे. दावा मिळकत भुसंपादन प्रक्रियेत गेल्याची बाब वादीने नाकारलेली नाही. त्यामुळे आता या न्यायालयास अधिकार क्षेत्र आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून नॅशनल हावयेज् कायदा १९५६ च्या कलम ३ (एच) ४ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये दिवाणी न्यायालयास अधिकार क्षेत्र येत असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अधिकार क्षेत्राचा मुद्दा येथे टिकत नाही.

**८.** वादीच्या दाव्यास ‘कॉज ऑफ ॲक्शन’ नसल्याने तो फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादीने मागणी केली आहे. करीता दावा **नि.०१** मधील परिच्छेद क्र.८ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये वादीने दावा दाखल करण्यास कारणीभुत ठरलेल्या कथनांचा स्पष्ट उल्लेख केल्याचे आढळते. करीता दाव्यास ‘कॉज ऑफ ॲक्शन’ नसल्याचा मुद्दा फेटाळण्यात येतो.

**९.** दावा मिळकत ही नॅशनल हायवे ऑथोरिटीने संपादित केली असल्याने व आता त्यावर केंद्र शासनाची मालकी आल्याने प्रस्तुतच्या दाव्यास नॅशनल हायवे ऑथोरिटी व भुसंपादन अधिकारी यांना पक्षकार करणे

आवश्यक असताना वादीने त्यांना पक्षकार न केल्याने दाव्यास 'नॉन जॉइंडर ऑफ नेसेसरी पार्टीज' या तत्वाची बाधा येत असल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. त्यास अनुसरून नॅशनल हायवे ऑथोरिटी ऑफ इंडीया कायदा १९८८ च्या कलम २८ चे अवलोकन केले असता, संपादित केलेल्या मिळकतीबाबत अथवा संबंधित मुद्दयांबाबत काहीही आक्षेप तक्रार असल्यास नॅशनल हायवे ऑथोरिटी यांना पक्षकार करता येणार नाही असे ग्राहय धरण्यात आलेले आहे. करीता प्रस्तुतच्या दाव्यास 'नॉन जॉइंडर ऑफ नेसेसरी पार्टीज' या तत्वाची बाधा येत नाही.

**१०.** वादीच्या दाव्यास नॅशनल हायवे कायदा १९५६ च्या कलम १४ आणि १५ ची बाधा येवून या न्यायालयास अधिकार क्षेत्र नसल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. त्यास अनुसरून नॅशनल हायवेज् कायदा १९५६ चे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा कायदा फक्त दहा कलमांचा असल्याने या न्यायालयास कलम १४ आणि १५ ची बाधा येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. करीता हा मुद्दा देखील येथे टिकत नाही.

**११.** वादींनी यापुर्वीच्या नियमित दिवाणी दावा क्र.९७/१८ मध्ये केलेली मागणी पुन्हा प्रस्तुतच्या दाव्यात केल्याने दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २ नियम २ ची बाधा येत असल्याचे वादीचे कथन आहे. परंतु प्रस्तुतचा दावा म्हणजेच नियमित दिवाणी दावा क्र.९२/२०१७ हा नियमित दिवाणी दावा क्र.९७/२०१८ च्या पुर्वी दाखल केला असल्याने यातील मागणीस नंतर दाखल केलेल्या दाव्याच्या मागणीची बाधा येण्याचा प्रश्नच येत नाही. सबब प्रस्तुतचा मुद्दा येथे टिकत नाही.

**१२.** वादीने दावा कलम १६ मध्ये मुद्दा क्र.३ आणि ४ मध्ये केलेल्या मागण्या महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यू कोड १९६६ च्या तरतुदींना अनुसरून केल्याने त्याबाबतचे निर्णय दिवाणी न्यायालयात घेता येणार नसल्याचे वादीचे कथन आहे. त्यास अनुसरून दाव्याचे अवलोकन केले असता, वादीने कलम १६ मध्ये मुद्दा क्र.३ आणि ४ अन्वये कोणतीच मागणी केली नसल्याचे दिसून येते. सबब हा मुद्दा देखील फेटाळण्यात येतो.

**१३.** प्रस्तुतची दावा मिळकत म्हणजेच गट क्र.४५ बाबत याच न्यायालयातील नियमित दिवाणी दावा क्र.६१/२०१७ मध्ये तडजोड होवून त्या मार्फतच्या हुकुमनाम्याने प्रतिवादीचे नाव दावा मिळकतीला लागल्याचे व सदर बाब वादीस माहिती असताना त्याने ते आज अखेर आव्हानीत न केल्याने पुन्हा नवीन दावा दाखल करता येणार नाही असे प्रतिवादीचे कथन आहे. सोबतच दावा कलम ६ मध्ये नमुद प्रमाणे दावा मिळकतीस प्रतिवादीचे नाव असल्याचे व ती संपादित झाल्याचे २०१२ सालीच वादीला कळाल्याचे स्पष्टपणे नमुद असताना प्रस्तुतचा दावा सन २०१७ साली दाखल केल्याने मुदतीच्या कायदयाची बाधा येत असल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. सदरचे संपुर्ण कथन वादीने नाकारले आहे. सदर करीता नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२०१७ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये वादी पक्षकार असल्याचे कोठेही दिसून येत नाही. त्यापुढे प्रतिवादीच्या दावा मिळकतीस असलेल्या नावाबाबत २०१२ साली कळाल्याचे नमुद असले तरी मुदतीचा मुद्दा हा तथ्ये आणि कायदा असा संमिश्र मुद्दा असल्याने तो या मितीस ठरविता येणार नाही. सदर करीता वादीच्या वकिलांनी माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या ***सलिम डी. आगबोटवाला आणि इतर विरूध्द शामलजी उदधवजी ठक्कर आणि इतर, सिव्हील अपील नं.५६४१/२०२१*** या न्यायानिर्णयावर भिस्त ठेवली आहे. प्रस्तुतच्या न्यायनिर्णयामध्ये मुदतीचा मुद्दा हा तथ्ये आणि कायदयाचा संमिश्र मुद्दा असल्याचे ग्राहय धरण्यात आलेले आहे. करीता सदरचा आक्षेप येथे टिकत नाही.

**१४.** वादीने प्रस्तुतच्या दाव्यामध्ये सुस्पष्ट आणि विशिष्ट मागणी मांडली नसून दावा मिळकतीचे वर्णन देखील मालकी हक्कास अनुसरून केलेले नसल्याने दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १२ आणि आदेश ७ नियम ३ व ७ ची बाधा येत असल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. येथे नियमित दिवाणी दावा क्र.९७/२०१८ हा या दाव्याच्या पुर्वीचा दावा नसल्याने प्रस्तुतच्या दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिताचे कलम १२ अन्वये अडथळा येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यापुढे वादीने केलेल्या मागण्या योग्य आहेत किंवा अयोग्य तसेच दावा मिळकतीचे वर्णन मालकी हक्कास

अनुसरून आहेत किंवा कसे ही बाब पुराव्याअंतीच स्पष्ट होणार आहे. करीता या दान्ही मुद्दयावर दावा फेटाळण्यास पात्र ठरत नाही.

**१५.** दावा मिळकत प्रतिवादीच्या नावे असून दि.१३.१२.२०१७ रोजी उपसंचालक भुमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी माननीय सक्षम प्राधिकारी तथा उपअधिकारी, पेण यांच्याकडे संपादन प्रक्रिया पुर्ण होण्याकरीता प्रकरण पाठविले असता त्याद्वारे दुरूस्त संयुक्त मोजणी, मोजणी पत्र आणि गटस्किम योजनेचे कागद तसेच उतारे या सर्वांवर प्रतिवादीच्या नावांची नोंद करण्यात आली आहे. गटस्किम रेकॉर्डनुसार प्रतिवादी हेच दावा मिळकतीचे मालक असल्याचे स्पष्ट दिसून येत असल्याने दावा प्रथमदर्शनीच फेटाळण्यास पात्र ठरत असल्याचे वादीचे कथन आहे. सदर बाब वादीने नाकारली आहे. येथे वादीने प्रस्तुतचा दावा हा त्याच्या मालकी हक्कास बाधा आल्यानेच दाखल केला असल्याने दावा मिळकतीच्या मालकी हक्काबाबतच प्रश्न निर्माण होवून त्याकरीताचाच निवाडा या न्यायालयामार्फत होणार असल्याने या मितीस प्रतिवादीच मालकी असल्याचे ग्राहय धरून दावा फेटाळणे कायदयाच्या तरतुदीला अनुसरून नाही. करीता प्रस्तुतचा मुद्दा फेटाळण्यात येतो.

**१६.** वादीने दावा मिळकत ही प्रतिवादीच्या नावे असल्याचे व त्याद्वारे ती संपादित होवून भुसंपादनाची रक्कम देखील प्रतिवादीस प्राप्त झाल्याचे दाव्यात नमुद केले आहे. त्यापुढे दावा मिळकतीचा ताबा देखील भुसंपान अधिकारी यांनी घेवून हायवेचे रूंदीकरणाचे काम पुर्ण झालेले आहे. अशा परिस्थितीत दावा मिळकतीबाबत झालेल्या दि.१०.०७.२०१७ रोजीच्या ॲवॉर्डबद्दल या न्यायालयासमोर दाद मागता येणार नसल्याचे व त्यास दिवाणी प्रकिया संहिताची कलम ९ ची बाधा येत असल्याचे वादीचे कथन आहे. त्यास अनुसरून नॅशनल हायवेज् ॲक्टच्या कलम ३ (एच) ४ चे अवलोकन केले असता, त्यामध्ये या न्यायालयास अशा प्रकारचे मुद्दयांकरीता दाद मागता येत असल्याचे मांडण्यात आले आहे. करीता सदरचे दोन्ही मुद्दे येथे टिकत नाही.

**१७.** वरील एकंदरीत चर्चेनंतर वादीने उपस्थित केलेले कोणतेही

मुद्दे येथे टिकत नसल्याने दावा फेटाळता येणार नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात येतो व पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **नि.क्र.१९** फेटाळण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत अंतिम निर्णयावेळी आदेश करण्यात येतील.

दिनांक : १७/०२/२०२३ **(श्रीमती रूबीना एन.मुजावर)**
पेण. **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेण.**

CERTIFICATE

“I affirm that the contents of this PDF file order are same word for word as per original order”.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | : Shri. A. A. Nakhawa |
| Name of the Court | : Smt. R. N. Mujawar<br>Civil Judge, J.D.and J.M.F.C. Pen |
| Date of Decision | : 17-02-2023 |
| Order signed by presiding officer | : 21-02-2023 |
| Date of PDF | : 22-02-2023 |
| Order uploaded on | : 22-02-2023 |